सायं.दैनिक
www.beedkisan.in
बीड किसान
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

## पंकजा मुंडे यांच्या हेलिकॉप्टर मध्ये बिघाड; दुर्घटना टळली

औरंगाबाद (किसान न्युज): भाजप नेत्या आणि राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या



हेलिकॉप्टरला आज औरंगाबाद विमानतळावर तांत्रिक बिघाड झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सुदैवाने, उड्डाण घेण्यापूर्वीच हा बिघाड वैमानिकाच्या लक्षात आल्याने एक मोठी दुर्घटना टळली आहे. या घटनेमुळे समर्थकांमध्ये काही काळ चिंतेचे वातावरण पसरले होते. पंकजा मुंडे सध्या जिल्हापरिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी मराठवाडा दौऱ्यावर आहेत. आज लातूर जिल्ह्यात त्यांच्या झंझावाती प्रचार सभांचे आयोजन करण्यात आले होते. औरंगाबाद येथून लातूरकडे झेप घेण्याच्या तयारीत असतानाच हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड असल्याचे निष्पन्न झाले. सुरक्षेच्या कारणास्तव वैमानिकाने तात्काळ उड्डाण रद्द करण्याचा निर्णय घेतला.

बीड ■ वर्ष ५ ■ अंक २६६ ■ मंगळवार, दि. ०३ फेब्रुवारी, २०२६ ■ पोस्टल दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२६ ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ पाने ४ ■ किंमत २ रु.
BEED ■ Year-5 ■ Issue-266 ■ Tuesday 03 February, 2026 ■ Postal Date 04 February, 2026 ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ Pages 4 ■ Price 2

## राज्याचे महसूलमंत्री म्हणतात गरीब शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा होणार

# शेतकरी ही श्रीमंत असतात? बावनकुळे साहेब श्रीमंत शेतकऱ्यांचे चार दोन नावे तरी सांगा..

**बीड । किसान न्युज**

**राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रचार सभेत गरीब शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा होणार असल्याचे प्रतिपादन केले. मात्र यानंतर राज्यभरात शेतकरी श्रीमंत असतात का? जर असतील तर चार दोन नावे सांगा असे आवाहन बावनकुळे यांना केले जात आहे. गरीब व श्रीमंत शेतकरी ठरवण्यासाठी कोणती पट्टी लावणार असा ही प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

### राज्यभरातील शेतकऱ्यांचा सवाल

भाजपाने विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात सत्ता आली तर पहिली सही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर करणार असे सांगितले होते. पण सत्ता स्थापन होऊन दीड वर्ष संपत आले तरी यावर काहीच कारवाई नसून याला विविध फाटे फोडून कर्जमाफीचा मुद्दा भरकटत ठेवण्यात आला. कर्जमाफी होणार की, नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. पण परत जिल्हापरिषद निवडणुकीमध्ये ही या शेतकरी कर्जमाफीच्या मुद्याचा लाभ घेण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा मुद्दा पुन्हा पुढे आला असून उस्मानाबाद जिल्ह्यातील येणेगुर येथे झालेल्या सभेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकरी कर्जमाफीबाबत स्पष्ट आणि ठाम भूमिका मांडली. गरीब शेतकऱ्यांची सरकारकडून कर्जमाफी केली जाणार असून, सरकारने दिलेला शब्द निश्चितपणे पाळला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. वर्षानुवर्षे शेतात राबणाऱ्या आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले. बावनकुळे यांनी कर्जाच्या वाढत्या व्याजदरांवर भाष्य करताना सांगितले की, कर्जावर व्याज आणि त्यावर पुन्हा व्याज वाढत जात असल्यामुळे अनेक शेतकरी मानसिक तणावाखाली जातात आणि आत्महत्येचा विचार करतात. अशा परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांना एकटे सोडणार नाही, असा दिलासाही त्यांनी दिला. गरीब शेतकरी ४०-४० वर्षे शेतात राबतात, कर्जबाजारी होतात आणि शेवटी हताश होतात; पण आम्ही त्यांना आत्महत्येपर्यंत जाऊ देणार नाही, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. या वक्तव्यामुळे महायुती सरकारकडून लवकरच कर्जमाफीसंदर्भात मोठा निर्णय जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यभरातील शेतकरी आता या निर्णयाच्या अधिकृत घोषणेची वाट पाहत आहेत. मात्र, बावनकुळे यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे ही कर्जमाफी फक्त गरीब शेतकऱ्यांसाठीच असेल. त्यामुळे गरीब शेतकरी, या निकषात नेमके

» पान २ वर



### फार्महाऊस अन् धनदांडगे शेतकरी वगळणार

केवळ शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी शासन लवकरच कर्जमाफीचा निर्णय घेणार असल्याचे सांगितले तर फार्महाऊस असणाऱ्या आणि धनदांडग्यांना यातून वगळण्यात येणार असल्याचे सांगितले मात्र याची तपासणी कशी करणार की, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करणार का? जर एखादा शेतकरी घर बांधून शेतातच राहत असेल तर तो फार्महाऊस ठरवणार का? प्रत्येकाच्या बांधावर जाऊन पाहणी करणार असाल तर यासाठी किती वर्ष लागणार? यापूर्वी अभ्यास सुरू असल्याचा शेतकऱ्यांना अनुभव असून आता फार्महाऊस पाहणीच्या नावाखाली पाच वर्ष पूर्ण करुन पुन्हा प्रचारातच कर्जमाफीचा लॉलीपॉप दाखवणार ? असे अनेक प्रश्न राज्यातील शेतकरी उपस्थित करीत आहेत.

# उसने घेतलेले दीड लाख परत द्यावे लागतील म्हणून मित्रानेच काढला काटा



### एलसीबीने खुनातील आरोपीला १० तासातच पकडले

**बीड । किसान न्युज**

पाटोदा तालुक्यातील डोंगरदेवी दगडवाडी शिवारात सोमवारी सकाळी रक्ताच्या थारोळ्यात सापडलेल्या चांद ऊर्फ गुड्डू तांबोळी (वय ३०) याच्या निघृण हत्येचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, चांदचा मित्र अतिक तांबोळी यानेच दीड लाख रुपयांच्या वादातून ही हत्या केल्याचे उघड झाले असून, पोलिसांनी त्याला मध्यरात्री बीड शहरातून बेड्या ठोकल्या आहेत. पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, मृत चांद याचे आरोपी अतिककडे १ लाख ५० हजार रुपये होते. तो या पैशांचा सतत तगादा लावत होता. विशेष म्हणजे, आरोपी अतिक याचे सोमवारीच लग्न होणार होते. पैसे दिले नाहीत तर तुझ्या लग्नात येऊन गोंधळ घालेन, असा इशारा चांदने दिला होता. यामुळे चिडलेल्या आणि लग्नात बदनामी होईल या भीतीने ग्रासलेल्या अतिकने रविवारी रात्री चांदला गाठले आणि दगडाने ठेचून त्याची निघृण हत्या केली. सोमवारी सकाळी घटना उघडकीस येताच परिसरात दहशतीचे वातावरण होते. एलसीबीचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी तपासाची चक्रे व

» पान २ वर

# पाटबंधारे विभागाचे कार्यालय परळी येथून स्थलांतरित करण्यात येऊ नये यासाठी प्रयत्नशील - धनंजय मुंडे

### चार महिन्यांपूर्वीच मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन केली होती लेखी विनंती



**परळी वै. । किसान न्युज**

पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता कार्यालय परळी वैद्यनाथ येथून स्थलांतरित करू नये, यासाठी आपण प्रयत्नशील असून याबाबत ४ महिन्यांपूर्वीच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांची भेट घेऊन लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे तसेच मुख्यमंत्री महोदयांनी जलसंपदा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी दिली आहे. काही माध्यमांमध्ये परळी वैद्यनाथ येथील पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता कार्यालय परळी येथून परभणी येथे स्थलांतरित करण्यात येत असल्याबाबत वृत्त प्रसिद्ध केले आहे, त्याबाबत धनंजय मुंडे यांनी माहिती दिली आहे. परळी वैद्यनाथ येथील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाच्या माध्यमातून बीड सह लातूर व परभणी जिल्ह्यातील काही भागाचे कामकाज सुरळीतपणे सुरू आहे. सदर कार्यालयाची स्थापना १९९५ साली करण्यात आलेली असून प्रशासकीय कारणास्तव हे कार्यालय स्थलांतरित करण्याची प्रक्रिया विभागाने प्रस्तावित केली होती. मात्र या कार्यालयाची इमारत सुस्थितीत असून कामकाज व्यवस्थितपणे सुरू आहे, तसेच तिन्ही जिल्ह्यांच्या कामकाजाच्या हिशोबाने परळी हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने हे कार्यालय बंद किंवा स्थलांतरित करण्यात येऊ नये, अशी विनंती धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस तसेच मंत्री श्री राधाकृष्ण विखे

» पान २ वर

# अजित पवार यांचा अस्थिकलश उद्या बीडमध्ये दर्शनासाठी

### दुपारी गोदावरी नदीत विधीपूर्वक विसर्जन

**बीड । किसान न्युज**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांचा अस्थिकलश मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी



सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्यालयात नागरिकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी ४ वाजता गेवराई तालुक्यातील राक्षसभूवन शनीचे येथील गोदावरी नदी पात्रात अस्थिकलशाचे विधीपूर्वक विसर्जन करण्यात येणार आहे. बीड शहरातील नागरिकांनी आपल्या दिवंगत लोकनेत्यास श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दि. ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत छत्रपती कॅपिटल, मित्र नगर चौक, बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण तसेच बीड शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी केले आहे.

### शहरात संत रोहिदास महाराजांची जयंती साजरी



बीड - दि.०१/०२/२०२६ रोजी बीड शहरात संत रोहिदास महाराज सार्वजनिक जयंती अतिशय उत्साहात पार पडली. त्यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करतांना शिवाजी कांबळे व कल्याण उनवणे सर होते त्यावेळी कार्यक्रमाचे मुख्य प्रमुख वक्ते मा.रामेश्वर तिरमुखे सर उपस्थित म्हणून लाभल्याले होते आणि मान्यवर मा.अजिंक्य भैय्या चांदणे डिपीआय अध्यक्ष, मा.शामसुंदर अण्णा पडुळे साहेब कृ.उ.बा.समिती उपाध्यक्ष बीड मा.चंद्रकांत नवले जिल्हाप्रमुख शिवसेना मा.प्रियंका डोईफोडे महिला जिल्हाध्यक्ष रा.कॉ.पा. मा.ज्योतीताई घुमरे भाजपा नेत्या मा.मनोज गोडसे नगरसेवक बीड यांच्या प्रमुख उपस्थितीत जयंतीचा कार्यक्रम पार पडला.

# केज नगरपंचायत घरकुल घोटाळा प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करा - आदित्य पाटील

**केज । किसान न्युज**

केज नगरपंचायत मधील पंतप्रधान आवास योजना (शहरी)' अंतर्गत ३ कोटी ६० लाख रुपयांचा महाघोटाळा झाल्याचा गंभीर प्रकार चौकशी समिती कडून उघड झाला आहे. या गैरव्यवहार प्रकरणातील अधिकारी पदाधिकारी यांसह सर्व दोषींवर गुन्हे दाखल करून कठोर



कारवाई करावी अशी मागणी केज नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील यांनी केली आहे. गोरगरिबांचे घरे गिळंकृत केली गेली. या प्रकरणावर आदित्य पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणातील दोषी अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करून अपहार झालेली पूर्ण रक्कन लाभार्थ्यांना मिळावी. दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा करावी अशी मागणी केज नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील यांनी केली आहे. पंतप्रधान आवास योजनेतून गोरगरिबांना टप्प्याटप्याने आर्थिक सहाय्य देण्यात येते. मात्र केज नगरपंचायतीमध्ये हा निधी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याऐवजी

» पान २ वर

पाहिजेत
पंपावर कामासाठी
मुले पाहिजे
हिना पेट्रोलपंप
जलना रोड बीड
:: संपर्क ::
मो.9765887739
मो.7798978799

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट
156,500
२२ कॅरेट
152,500
चांदी प्रतिकिलो
280,000

### प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा चे आवेदन पत्र भरण्यास मुद्दत वाढ

**बीड । किसान न्युज**


प्राथमिक शिष्यवृत्ती इत्या ४ व उच्च प्राथमिक इत्या ७ वी ची परीक्षा राज्यात एकाच दिवशी २६ एप्रिल २०२६ रोजी होणार असून सदर परीक्षेची अधिसूचना ३१ डिसेंबर २०२५ रोजी परीक्षेच्या www.mscepune.in d http/:puppssmsce.in. या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर परीक्षे करिता शाळा नोंदणी व विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज दाखल करण्यासाठी ३० डिसेंबर ते २ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती तथापि शाळांना शाळा नोंदणी व विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज दाखल करण्यासाठी १३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदत वाढ करण्यात आली आहे तरी या परीक्षेत जास्तीत जास्त शाळांनी नोंदणी करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

# उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या जागेवर अतिक्रमणाचा आरोप

### गायरान धारक कुटुंबांचा १९८७ पासून ताबा; १३ कोटींचा निधी वादात

**बीड । किसान न्युज**

तालुक्यातील घोसपुरी येथील उपप्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालयासाठी शासनाने मंजूर केलेल्या गट क्र. ९२ मधील इमारतीच्या जागेचा १९८७ पासून ताबा आहे. गायरान धारक ही शेती कसून आपली उपजीविका करतात. यामुळे हा निधी वादात अडकला असून, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. यामुळे आता काय होणार याकडे बीड तालुक्याचे लक्ष लागले आहे. या प्रकरणी भारत लक्ष्मण कानडे (रा. घोसपुरी, ता. जि. बीड) यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे





निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पिंपळगाव मार्गावर गट क्रमांक ५९ मध्ये उपप्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी १२ एकर शासकीय जमीन देण्यात आली आहे. येथेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची इमारत, वाहनतळ व ब्रेक टेस्टर ट्रॅक उभारण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यामुळे आमच्यावरही अन्याय होणार नाही. असे असतानाही आमचा ताबा असलेल्या घोसापुरी शिवारातील गट क्र. ९२ मध्ये ही

» पान २ वर

कार्यालय नगर परिषद,बीड
बशिरगंज,बीड ता.जि.बीड महाराष्ट्र -४३११२२

ई-निविदा
बांधकाम विभाग

नगर परिषद, बीड बांधकाम विभाग विभागांतर्गत शहरातील कामाच्या ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.३०/०१/२६ सकाळी ११:०० वाजेपासुन ते दि.०५/०२/२६ दुपारी १६:०० वाजेपर्यंत पाहवयास मिळतील.
निविदेतील अटी व शर्ती सह इतर संपुर्ण तपशील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मुख्याधिकारी
नगर परिषद बीड